# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १८/१०/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५७१** **विषय क्रमांक- ५७१**
**दिनांक – ०१/०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७१ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.वैद्य/ ९ड /कावि /२२३/२०२४ दिनांक - ०१/०३/२०२४ अन्वये, मनपाचे कर्करोग रुग्णालय, थेरगांव पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पी.पी.पी.) तत्वावर सुरु करणे बाबत. |
| **ठराव क्र. ५७१ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.वैद्य/ ९ड /कावि /२२३/२०२४ दिनांक - ०१/०३/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील व आसपासच्या नागरिकांना कर्करोग या दुर्धर आजाराच्या उपचारासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रात कर्करोग रुग्णालय कार्यान्वीत करण्याची बाब प्रस्तावीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन थेरगांव रुग्णालयाशेजारील मोकळया जागेमध्ये कर्करोग रुग्णालय पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पी.पी.पी.) तत्वावर सुरु करणेकामी सी.टी.ओ. विभागामार्फत RFP तयार करण्याची कार्यवाही चालू आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन थेरगांव रुग्णालयाच्या आवारामधील मोकळया जागेमध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पी.पी.पी.) तत्वावर कर्करोग रुग्णालय सुरु करण्याची बाब नव्याने असून हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे मा.महापालिका सभा यांची मान्यता घेणेस आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णयः** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५७२** **विषय क्रमांक- ५७२**
**दिनांक – ०१/०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७२ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पवै/०३/कावि/४७/२०२४ दि.२२/०२/२०२४ आणि मा..स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३१२६ दि.२७/२/२०२४ अन्वये, पिंपळे सौदागर, डॉग पॉर्क चे ठिकाणी सेवा शुल्क लागू करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५७२** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पवै/०३/कावि/४७/२०२४ दि.२२/०२/२०२४ |

<table>
<tr><td>दिनांक - ०१/०३/२०२४</td><td>आणि मा..स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३१२६ दि.२७/२/२०२४ अन्वये, पिंपळे सौदागर येथे विकसित झालेल्या बाबींसह डॉग पार्क नागरिकांकरीता दि. १४ जाने. २०२४ पासून खुले करण्यात आलेले आहेत. पशुवैद्यकीय विभागामार्फत कर्मचारी नियुक्त करुन डॉग पार्क मधील देखभाल व साफसफाईचे कामकाज करण्यात येत आहे. श्वान मालकांशी योग्य समन्वय राखून कामकाज करण्यात येत आहे. त्यामुळे त्याठिकाणी प्राणीमित्र तसेच श्वानांसह – श्वान मालकांची ये-जा चालू असते. त्यानुषंगाने सदर ठिकाणी नागरिकांसाठी श्वानांना फिरण्यास वॉकवेयस (फुटपाथ), खेळण्यास मोकळे लॉन्स, डॉग माऊंन्ड (छोटे व मोठे श्वानांसाठी वेगळे) व श्वानांकरीता सेलिब्रिशन पॉईन्ट इत्यादी प्रकारचे सुविधा विकसित करुन नागरिकांसाठी वापरण्यास खुले करण्यात आलेले आहे. या करीता खालील नमूद तक्त्याप्रमाणे सेवा शुल्क आकारणे आवश्यक आहे.
<table>
<tr><td>अ.क्र.</td><td>तपशिल</td><td>सेवा शुल्क</td></tr>
<tr><td>१</td><td>प्रवेश शुल्क<br>(सकाळी ०६.०० ते सकाळी १०.००)<br>(संध्या. ०५.०० ते रात्री ०९.०० )</td><td>र.रु. २०/-<br>(प्रति व्यक्ती एका श्वानांस एका सत्राकरीता)</td></tr>
<tr><td>२</td><td>मासिक शुल्क</td><td>र.रु. ५००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>सेलिब्रिशन पॉईन्ट शुल्क</td><td>र.रु. १०००/- (प्रति २ तासांकरीता)</td></tr>
</table>
तरी उक्त प्रमाणे पिंपळे सौदागर येथील डॉग पार्क या संकल्पनेस सेवा शुल्क आकारुन सेवा दर पत्रक लागू करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय:</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५७३** **विषय क्रमांक- ५७३**
**दिनांक – ०१/०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७३ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/४१/१६/२०२४ दिनांक - २७/०२/२०२४ अन्वये, मौजे मामुर्डी वीरबाबा चौक ते मामुर्डी गावठाण पर्यंत मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्त्याने बाधित जमिनीचे भूसंपादन करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५७३ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/४१/१६/२०२४ दिनांक - २७/०२/२०२४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस –१८०५/१०५०/प्र.क्र.–७९५/०५/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३, दि. १८/०८/२००९ अन्वये मंजूर झालेली असून अधिसूचना क्र. टीपीएस/१८१२/१६०/प्र.क्र.५८/१२/ पुर्नरचना क्र.२७/१२/ईपी मंजूर/नवि-१३, दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. |

<table>
<tr><td></td><td>

मौजे मामुर्डी येथील स.नं.१७पै, स.नं. २१पै, स.नं. १९पै, स.नं. १८पै, स.नं. १८पै, स.नं. १५पै, स.नं.२पै, स.नं.१ व स.नं.३५पै. मधील वीरबाबा चौक ते मामुर्डी गावठाण पर्यंत सुमारे १२००.०० मी लांबीचा १८.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेत आला असुन सदर रस्ता अद्याप मनपाच्या ताब्यात आलेला नाही. शहराचे वाढती लोकसंख्या व त्यामुळे वाढती रहदारी पाहता उक्त रस्त्याचे खालील तक्यात दर्शविलेल्या प्रमाणे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>आ.क्र.</th><th>रस्ता/ आरक्षणाचे प्रयोजन</th><th>स.न./स.न</th><th>बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी.</th></tr>
<tr><td>१</td><td>-</td><td>१८.०० मी रस्ता</td><td>मौजे मामुर्डी येथील १८.०० मी रस्ता = स.न.१७ पै,स.न.२१ पै,स.न.१९ पै,स.न.१८ पै,स.न.१८ पै,स.न.१५ पै,स.न.२ पै,स.न.१ व स.न.३५ पै.</td><td>१८.०० मी. रस्ता = २१६००.०० चौ.मी.</td></tr>
</table>

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

</td></tr>
<tr><td>निर्णय:</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**प्रशासक ठराव क्रमांक- ५७४** **विषय क्रमांक- ५७४**

**दिनांक – ०१/०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७४ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. .पापु/मुख्य/तां./३८/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पाणी मिटर्सच्या नोंदी घेऊन, जागेवर देयक अदा करणे या कामास मुदतवाढ मिळणेबाबत व वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत. |
| | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. .पापु/मुख्य/तां./३८/२०२४ अन्वये, पिंपरी |

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ५७४ दिनांक - ०१/०३/२०२४** | चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रातील सर्व पाणी मिटर्सच्या नोंदी घेऊन जागेवर देयक अदा करणे हे काम मे. क्रँनबेरी एन एक्स सर्व्हिसेस प्रा. लि. यांना आदेश क्रमांक - पापु/६/कावि/३४४/२०१६, दिनांक २४/०२/२०१६ अन्वये देण्यात आले आहेत. सदर कामाचा कालावधी पाच वर्षांसाठी असून सदर कामाची मुदत २३ फेब्रुवारी २०२१ रोजी संपली आहे. सदर कामासाठी र.रु.१६,०७,२५,२५४/- इतक्या रकमेस मा. स्थायी समितीने ठराव क्र. १४९६८ दि. ०३/०२/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामास मा.स्थायी समिती ठ.क्र.१०५९४ दि.३/११/२०२१ अन्वये, र.रु.३,४०,००,०००/- चे वाढीव खर्चासह दि.३१/३/२०२२ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच मा.स्थायी ठराव क्र.२२, दि.०६/०४/२२ नुसार वाढीव खर्चासह र.रू.६,००,००,०००/- रकमेस दि.३१/०३/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.१२९७, दि.०८/०३/२०२३ अन्वये र.रू.१,३०,००,०००/- वाढीव खर्चासह दिनांक ३०।०६।२०२३ अखेर मुदतवाढ देणेत आली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.१९३२, दि.११/०७/२०२३ अन्वये र.रू.१,३०,००,०००/- वाढीव खर्चासह दिनांक ३०।०९।२०२३ अखेर मुदतवाढ देणेत आली आहे.<br>त्यानंतर मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०४, दि.१०/१०/२०२३ नुसार दि.३१/१२/२०२३ पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. त्यानंतर मा.स्थायी समिती ठराव क्र.२८६५, दि.१६/०१/२०२४ नुसार दि.३१/०३/२०२४ पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. सदर मुदतवाढ दि.३१/०३/२०२४ अखेर रोजी संपुष्ठात येत असल्याने पुढील ६ महिने दि.३०/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबतचे पत्र मे. क्रँनबेरी एन.एक्स. सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी त्यांच्या दि.१६/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. या कामासाठी पाणीपुरवठा विभागामार्फत नव्याने निविदा तयार करण्यात आली असून, निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. नव्याने काढण्यात येत असलेल्या निविदेमध्ये विविध शहरातील पाणी देयक प्रणालींचा अभ्यास करण्यात आलेला आहे. निविदा प्रक्रियेअंतर्गत सदर नस्ती माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविली असता स्मार्ट सिटी कामांतर्गत महापालिकेच्या सर्व विभागांसाठी ERP Software चे काम चालू असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच मा. अति. आयुक्त (१) यांच्या कार्यालयात मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी व करसंलकन विभाग यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत सदर ERP Software तयार होण्यास विलंब होणार आहे, असे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी सांगितले. सदरचे ERP Software आल्यानंतर पाणी बिलींगच्या निविदेमध्ये बदल करणे आवश्यक राहील. नवीन निविदा काढणे कामाचे निविदेत सुचविलेले बदल करणेस कालावधी लागणार आहे. त्यामुळे सदर निविदा कार्यवाहीस विलंब होणार आहे.<br>यापूर्वी पाणी बिलिंगचे Software & its Regular Maintenanceचे काम एका एजन्सीकडे व फक्त रिडिंगचे काम दुसऱ्या एजन्सीकडे अशा प्रकारच्या कामाचा पूर्वीचा अनुभव (सन २०१२ ते २०१५) विचारात घेऊन या सन २०१६ मध्ये दोन्ही कामाची जबाबदारी निविदा कडून एकच एजन्सीकडे देण्यात आली होती व त्यामध्ये गेल्या ६ वर्षात काहीही अडचण आली नाही व त्याच पद्धतीची निविदा काढणे प्रस्तावित होते .<br>उपरोक्त दोन्ही बाबी विचारात घेता निविदा प्रक्रियेस विलंब लागू शकतो व बिलींगचे काम चालू ठेवणे आवश्यक आहे. यास्तव आहेत्याच एजन्सीला दिनांक |

| | |
|---|---|
| | ३०/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देणेयोग्य राहील, म्हणजेच सदर कामा पोटी अद्यापपर्यंत मुदतवाढसह होणारा खर्च र.रु.३३,२७,२५,२५४/- इतका येणार आहे. पैकी मा.स्थायी समिती ठराव क्र.२८६५, दि.१६/०१/२०२४ अन्वये रक्कम रू. ३०.६७.२५.२५४/- या वाढीव खर्चासह दि.३१/०३/२०२४ पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. तरी सदर कामास दि. ३०/०९/२०२४ पर्यंत अथवा नव्याने कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन, कामाच्या आदेशाचे तारखेपर्यंत मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास व सदर कामा पोटी होणा-या एकूण र.रु.३३,२७,२५,२५४/- खर्चास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५७५**
**दिनांक – ०१/०३/२०२४**

**विषय क्रमांक- ५७५**
**खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७५ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र स्था/२५/कावि/२०/२०२४ दि.२८/०२/२०२४ अन्वये, अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रमा अंतर्गत मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रमा अंतर्गत प्राप्त निधीबाबत. |
| **ठराव क्र. ५७५ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र स्था/२५/कावि/२०/२०२४ दि.२८/०२/२०२४ अन्वये, राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन अल्पसंख्यांक समुदायाच्या एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासन निर्णय क्रमांक क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९,मंत्रालय,मुंबई-४०००३२. दि.१८/०६/२०१५ नुसार योजनेची कार्यपद्धती निश्चित करणेत आली आहे. त्यानुसार क्षेत्रविकास कार्यक्रम अंतर्गत विकास काम हाती घेण्यास संबंधित महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.<br>महाराष्ट्र शासनचे शासन निर्णय क्र. नाक्षेवि-२०२३/प्र.क्र.८४/का.९, मंत्रालय, मुंबई-४०००३२. दि. ०२ नोव्हेबर, २०२३ नुसार राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२३- २४ करिता पिंपरी चिंचवड मनपामधील खालील नमूद केलेल्या कामास निधी उपलब्ध झाला आहे. सदर कामांसाठी तांत्रिक मान्यता घेवून परिपुर्ण असे प्रस्ताव तयार करण्यात येत आहेत. |

| अनु क्र. | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कामांची नावे | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | चिंचवड गावठाण गांधी पेठ येथील जमातुल मुस्लिमीन शाही मस्जीद मुस्लिम दफनभूमी येथे माती बदलणे, इंटरलॉकिंग ब्लॉक टाकणे,नागरिकांकरिता निवारा शेड बांधणे इ.तद्नुषंगिक विकास | २०लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | कामे करणे. | |
| २ | रावेत येथील मोनी बाबा आश्रम गुरुद्वारा परिसरात अंतर्गत रस्ते काँक्रिटाकरण करणे, इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे व तद्नुषंगिक विकास कामे करणे. | १० लक्ष |
| ३ | थेरगाव पडवळ नगर ड्रायव्हर कॉलनी येथील जामा मशीद भागातील अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे, इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे व तद्नुषंगिक विकास कामे करणे. | १० लक्ष |
| ४ | विकासनगर किवळे येथील एम एन थॉमस चर्च ऑफ गॉड बोपदेव नगर परिसरात अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे, इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे व तद्नुषंगिक विकास कामे करणे. | १० लक्ष |
| ५ | किवळे येथील मलंकारा चर्च मीरा कॉलनी विकास नगर परिसरात अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे व तद्नुषंगिक विकास कामे करणे. | १० लक्ष |
| ६ | विकासनगर किवळे येथल एम एन थॉमस चर्च ऑफ गॉड बोपदेव नगर परिसरात येथे सौर उर्जचे दिवे, पथदिवे, हायमास्ट दिवे बसविणे, व विद्युत विषयक कामे करणे. | १०लक्ष |
| ७ | थेरगाव येथील दिल्ली दरबार मस्जिद डांगे चौक बी आर टी रोड वाकड मस्जिद परिसरात अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे, इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे व तद्नुषंगिक विकास कामे करणे. | १०लक्ष |
| ८ | पिंपळे गुरव येथील रामकृष्ण मंगल कार्यालय येथील थॉमस चर्च शिवराम नगर येथील परिसरात सौर उर्जचे दिवे, पथदिवे, हायमास्ट दिवे बसविणे व विद्युत विषयक कामे करणे. | ०५ लक्ष |
| | एकुण रक्कम रु. (लक्ष) | ८५लक्ष |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्य क्षेत्रामधील उपरोक्त सर्व कामांस क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७६ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र स्था/कक्षे/प्र.क्र./२/१६/२०२४ दि.२९/०२/२०२४ अन्वये, प्रभाग क्र. २ मोशी गट नं १२५२ शिवरस्ता ते गट नं ७५२(पुणे नाशिक हायवे) पर्यंतचा ३० मी.डी.पी रस्ता विकसित करणे या कामामध्ये होणा-या स्थळ बदलाबाबत. |
| **ठराव क्र. ५७६ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र स्था/कक्षे/प्र.क्र./२/१६/२०२४ दि.२९/०२/२०२४ अन्वये, प्रभाग क्र. २ मोशी गट नं १२५२ शिवरस्ता ते गट नं ७५२(पुणे नाशिक हायवे) पर्यंतचा ३० मी.डी.पी रस्ता विकसित करणे या कामामध्ये होणा-या स्थळ बदलाबाबत कामाचा आदेश ठेकेदार मे. धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांना दि. 11/03/2022 रोजी देणेत आला असून कामाची मुदत 24 महिने (दि. 10/03/2024 अखेर) आहे. सदर रस्ता पुणे नाशिक हायवे ते तळवडे पर्यंत जाणारा 30 मी. रूंद डि पी रस्ता असून क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत सदर रस्त्याची लांबी (नाशिक हायवे ते आकुर्डी रस्ता गट नं 891 पर्यंत) 3.9 कि.मी. इतकी आहे. त्यापैकी प्रथम टप्प्यामध्ये पुणे नाशिक हायवे ते गट नं 1252 शिव रस्त्यापर्यंतचा 1.7 कि.मी. लांबीचा रस्ता विषयांकित कामामधून करणेचे नियोजन होते. परंतू विषयांकित कामाचे ठिकाणी मुळ जागा मालक यांनी रस्त्याचे रेखांकनाबाबत (प्रलंबित व प्रस्तावित रस्ता ) आक्षेप घेतलेने तसेच बाधित क्षेत्र मनपाचे ताब्यात न दिल्याने आजअखेर सदरचे काम पुर्ण झाले नाही. सद्यस्थितीत सदरचे काम 25 % इतके पुर्ण झाले आहे. क क्षेत्रीय कार्यालय मार्फत दि. 27/02/2024 रोजी नाशिक हायवे ते आकुर्डी रस्ता (गट नं 891) या 3.9 कि.मी. लांबीच्या 30 मी. रूंद डी पी रस्त्या पैकी वडाचा मळा, जाधवाडी (गट नं 688 ) ते आकुर्डी रस्ता (गट नं 891) या 1 कि.मी. लांबीच्या 30 मी. रूंद डिपी रस्त्याने बाधित क्षेत्रामधील अतिक्रमण / बांधकामे/पत्राशेड निष्काशित करणेची कारवाई पुर्ण करणेत आली असून सदरचे बाधित क्षेत्र प्रपत्र अ व ब द्वारे ताब्यात घेणेची कार्यवाही सुरू आहे. तथापि, अतिक्रमण निष्कशित करणेची कारवाई झालेल्या ठिकाणी पुनष्चः अतिक्रमण होणेपुर्वी त्वरित 30 मी. रूंद डि पी रस्त्याचे काम सुरू करणे आवश्यक आहे. तरी अतिक्रमण झालेल्या ठिकाणी विषयांकित कामामधून 1 कि.मी. लांबीचा 30मी. रूंद रस्ता करणे शक्य आहे. परंतू सदर रस्ता करताना होणा-या स्थळ बदला करिता मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी नाशिक हायवे ते आकुर्डी रस्ता या 30 मी रूंद डी पी रस्तामधील क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणा-या वडाचा मळा जाधववाडी (गट नं 688) ते आकुर्डी रस्ता (गट नं 891) या ठिकाणी मे. धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांचे कडील प्रभाग क्र. 2 मोशी गट नं 1252 शिवरस्ता ते गट नं 752 (पुणे नाशिक हायवे) पर्यंतचा 30 मी डी पी रस्ता विकसित करणे या चालू कामामधून करणेसाठी जागेमध्ये होणा-या स्थळबदलास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५७७** **विषय क्रमांक- ५७७**
**दिनांक – ०१/०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७७ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र माध्य/शि/०१/कावि/६७/२०२४ दि.२९/०२/२०२४ अन्वये, माध्यमिक विद्यालय,केशवनगर या विद्यालयातील विद्यार्थी कै.सार्थक हर्षवर्धन कांबळे याच्या कुटूंबाला आर्थिक मदत देणे बाबत. |
| **ठराव क्र. ५७७ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र माध्य/शि/०१/कावि/६७/२०२४ दि.२९/०२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत माध्यमिक विद्यालय,केशवनगर या विद्यालयात दि.१६/०२/२०२४ रोजी शाळा सुरू असताना इयत्ता ८ वी तुकडी अ मधील कै.सार्थक हर्षवर्धन कांबळे याचा विद्यालयातील जिन्याच्या दुस-या मजल्यावरील रिलींगवरून घसरताना खाली पडून मृत्यू झालेला आहे.त्याअनुषंगाने कै.सार्थक हर्षवर्धन कांबळे या विद्यार्थ्याच्या गरीब परिस्थितीमुळे त्यांच्या कुटूंबाला पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत र.रू.५ लाख विशेष बाब म्हणून अर्थसहाय्य करणेस आर्थिक मदत करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५७८** **विषय क्रमांक- ५७८**
**दिनांक – ०१/०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७८ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र नगररचना/४४/०९/४६१/२०२४ दि. २९/०२/२०२४ अन्वये, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे अखत्यारीतील तळेगाव औद्योगिक क्षेत्र फेज-२ मधील ४५००.०० चौ.मी क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेसाठी ब्रेक प्रेशर टँक (BPT) बांधणेकामी मिळालेल्या भूखंडाबाबत मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५७८ दिनांक - ०१/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र नगररचना/४४/०९/२०२४ दिनांक – २९/०२/२०२४ अन्वये, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे अखत्यारीतील तळेगाव औद्योगिक क्षेत्र फेज-२ मधील ४५००.०० चौ.मी क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेसाठी ब्रेक प्रेशर टँक (BPT) बांधणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी भामा आसखेड धरण येथील अशुध्द जलउपसा केंद्रापासुन नवलाख उंब्रे येथे ब्रेक प्रेशर टँक पर्यंत १७०० मि.मी. व्यासाची मेन राईजिंग पाईप लाईन टाकणे या कामाअंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे क्षेत्रातील तळेगाव औद्योगिक क्षेत्र फेज-१ व फेज-२ यांना जोडणाऱ्या ४५.०० मी. रूंद रस्त्यालगत ब्रेक प्रेशर टँक साठी जागा उपलब्ध होणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस तळेगाव औद्योगिक क्षेत्र फेज-२ मधील ४५००.०० चौ.मी. भुखंड वाटप करण्याचा निर्णय घेणेत आलेला आहे. |

| | |
|---|---|
| | उक्त प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या मार्फत प्रादेशिक अधिकारी – १ MIDC, पुणे यांचे कडील दिनांक २३/०२/२०२४ रोजीचे E- MAIL द्वारे प्राप्त पत्र क्र. ROP/Tal-2/L- 762 प्राप्त झाले असुन विषयांकीत जागेसाठी र.रू.५७२४/- + १५% असे एकुण ६५८३/- प्रति चौ.मी. निश्चित केला असुन एकुण र.रू.२,९६,२३,५००/- (अक्षरी दोन कोटी शहान्नव लाख तेवीस हजार पाचशे रूपये फक्त) अटींसहीत अदा करणे बाबत कळविले आहे. तथापी दि. ०८/०२/२०२४ रोजी चे पत्र क्र. नरवि/कावि/४४/०५/२०२३ अन्वये अदा केलेली र.रू.६४,३९,५००/- वजा करीता एकुण उर्वरीत र.रू.२,३१,८४,०००/- (अक्षरी दोन कोटी एकतीस लाख चौऱ्याऐंशी हजार रूपये फक्त) ३० दिवसाच्या कालावधीमध्ये RTGS / DD या स्वरूपात Dy. Chief Accounts Officer, MIDC, Pune यांना अदा करणेबाबत कळविले असल्याने विषयांकित ताब्यात घ्यावयाचे क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीबाहेर असल्याने त्याकामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही-
(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

सही-
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका